क्र.महानिर्मिती/ मासं-सेप्र/ No 6563 दिनांक:- 21 JUN 2019

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७ अंतर्गत सुरक्षा व अग्निक संवर्गातील रिक्त पदासाठीची कागदपत्रे जमा करण्यासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.**

**संदर्भ:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७**
**२) अधिसुचना दि.२९.११.२०१८**
**३) अधिसुचना क्र.महानिर्मिती/ मासं-सेप्र/४३५० दि.२५.०४.२०१९**

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७ अंतर्गत कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदाच्या भरतीसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन पुर्नपरीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेवून उमेदवारांची १:१० या प्रमाणात शारिरीक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक चाचणी घेण्यात आली होती. सदर शारिरीक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक चाचणीत उत्तीर्ण ठरलेल्या उमदेवारांची कागदपत्र जमा करण्याची यादी ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१) उमेदवारांची सदरील यादी ही उमेदवारांना ऑनलाईन पुर्नपरीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार शारिरीक क्षमता (PET) आणि मनोविश्लेषणात्मक चाचणीत उत्तीर्णतेनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता,वय,जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण,महिला आरक्षण, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्राची कागदपत्रे जमा करतेवेळी तपासणी करण्यात येईल.

२) सदरील यादीतील सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे,प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी सर्व मूळ प्रमाणपत्रे कागदपत्रे जमा करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) ज्या महिला उमेदवारांची कागदपत्र जमा करण्याकरीता निवड ही खुल्या प्रवर्गात महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली आहे, अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे.

४) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

५) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता ही जाहिरातीस अनुसरुन कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

६) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६ अन्वये कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदांच्या निवडीकरीता वैध आहेत अथवा नाहीत याबाबतच्या अहवालाकरीता संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात येतील. सदर उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल संबंधित उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन प्राप्त झाल्यानंतरच पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदाची सदरील यादी तयार करताना ऑनलाईन परीक्षेत समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठताक्रम ठरविण्यात आलेला आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदाची सदरील यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

९) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१०) सदरील यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही, ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

११) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३) कागदपत्र जमा करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज,त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता खाली नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. खाली नमूद दिनांक व वेळेनंतर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

उमेदवारांनी कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदाच्या कागदपत्र जमा करण्याच्या पात्रता यादीकरीता येथे क्लिक करावे.

**कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)) या पदाची कागदपत्रे जमा करण्याकरीताची यादी.**

**कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) या पदाची कागदपत्रे जमा करण्याकरीताची यादी.**

**" अग्निक (Fireman) " या पदाची कागदपत्रे जमा करण्याकरीताची यादी.**

| पदाचे नाव | दिनांक | वेळ | उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) | १२.०७.२०१९ | सकाळी १०.०० वाजता | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१<br>दूरध्वनी क्रमांक : ०२२-२४०२१०२२ |

कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) (Jr.Officer (Security)), कनिष्ठ अधिकारी (अग्निक) (Jr. Fire Officer) व अग्निक (Fireman) या पदाच्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणातंर्गत अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. सदरची यादी उमेदवारांच्या माहिती करीता महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

C:\Users\00011258\Desktop\Document Verification.docx